खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर

## ता.खेड, जि.पुणे

## भूगोल विभाग

# भोरगिरी ते भीमाशंकर पदभ्रमण

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या भूगोल विभागातर्फे दरवर्षी अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये अनेक वर्गांतर्गत उपक्रम, सहल, क्षेत्रभेट, गाव सर्वेक्षण इत्यादि उपक्रमांचा समावेश होतो. दि. 13/09/2025 रोजी भूगोल विभागाने भीमाशंकर गिर्यारोहनाचा उपक्रम पूर्ण केला या उपक्रमामध्ये एफ.वाय.बी.ए.चे 50 विद्यार्थी सहभागी झाले होते.

सकाळी 7.00 वा विद्यार्थी प्राध्यापकांच्या समवेत गिर्यारोहन करण्यासाठी राजगुरूनगरहून भोरगिरीकडे निघाले. विद्यार्थी सकाळी 8.30 वाजता भोरगिरी येथे पोहोचले. तेथे त्यांनी थोडासा अल्पोपहार घेतला. त्याचवेळी विद्यार्थ्यांनी भोरगिरीच्या आसपास असणारे भोरगड, नारायणीच्या झुऱ्यावरील धबधबे यांचे दुरून दर्शन घेतले. सकाळी 9.00 वा विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांच्या समवेत भोरगिरीवरून भीमाशंकरकडे प्रयाण केले. भोरगिरी ते भीमाशंकर हे अंतर 6 किलोमीटर आहे. रस्ता हा पायवाट असून जो डोंगराळ भागातून आणि जंगलातून गेलेला आहे. या भागात अनेक वन्य प्राणी आणि वनस्पती आढळतात.

भोरगिरी ते भीमाशंकर पदयात्रा करताना विद्यार्थी रगतगमत चालले होते. वातावरण पावसाळी असल्याने उन्ह जाणवत नव्हते. वनातून पदभ्रमण करताना पायवाटेवरून विद्यार्थी रांगेत जात होते. जाताना बरोबर असणाऱ्या डॉ. दिलीप मुळूक आणि प्रा. एम.एल. मुळूक यांनी विद्यार्थ्यांना परिसराची माहिती दिली. परिसरात असणारे वन्य प्राणी आणि वनस्पती यांची विद्यार्थ्यांना माहिती दिली.

सुमारे दोन तास पदभ्रमण केल्यानंतर विद्यार्थी भीमाशंकर येथे पोहोचले. जाताना त्यांनी गुप्त भीमाशंकराचे दर्शन घेतले. भीमाशंकर येथे गेल्यानंतर विद्यार्थ्यांनी डाकिन्या भीमाशंकरचे दर्शन घेतले. यावेळी विद्यार्थ्यांनी भीमा नदीचा उगम होणारे मूळ भीमाशंकर, डाकिन्या

भीमाशंकरच्या जवळ असणारे कुंड पाहिले. पश्चिमेस जाऊन कोकण कडा पाहिला. खाली दिसणारे कोथळगडाचे विहंगम दृश्य पाहिले. त्यासंबधी प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी भीमाशंकर परिसरात असणारे हनुमानतळे पाहिले. तसेच तेथील वन्य जीवसृष्टी पाहिली. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना त्या संदर्भात मार्गदर्शन केले. तेथील दुकाने आणि स्थानिक व्यापार या विषयी विद्यार्थ्यांनी माहिती करून घेतली. भीमाशंकर मंदिराच्या इतिहासाची माहिती करून घेतली.

सुमारे दीड तास त्या परिसरात घालविल्यानंतर विद्यार्थ्यांनी पुन्हा परतीचा प्रवस सुरू केला.परतीच्या प्रवासात एक निसर्गरम्य स्थान पाहून विद्यार्थ्यांनी वनभोजन केले. तेथे भीमा नदीने तयार केलेली अनेक भूरूपे उदा.यू आकाराची दरी, व्ही आकाराची दरी, घळई, धावत्या, धबधबे इत्यादि भूरूपे पाहिली. या भूरूपांसंबंधी प्रा. एम.एल.मुळूक आणि विभागप्रमुख डॉ. दिलीप मुळूक यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

वनभोजन झाल्यानंतर पुन्हा निसर्गाचे निरीक्षण करीत विद्यार्थी भोरगिरी येथे पोहोचले. त्यानंतर बसने राजगुरूनगर येथे पोहोचले.

या पदभ्रम्रंतीसाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी अनुमती दिली. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे हे सहलीसोबत बरोबर होते. भूगोल विभागप्रमुख डॉ. दिलीप मुळूक यांनी या पदभ्रमण सहलीचे आयोजन केले. प्रा. एम.एल.मुळूक यांनी कार्यवाही केली.

विभाग प्रमुख
भूगोल विभाग
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय
राजगुरूनगर, (खेड) जि. पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे.

काही क्षणचित्रे –



भीमाशंकर पदभ्रमधामध्ये सहभागी विद्यार्थी. समवेत डॉ. संजय शिंदे, प्रा.एम.एल.मुळूक



भीमाशंकर पदभ्रमणामध्ये भीमा नदीचे पात्र ओलांडताना विद्यार्थीनी.



भीमाशंकर पदभ्रमण करताना विद्यार्थी.



भीमाशंकर मंदिर परिसरात विद्यार्थी.



भोरगिरी परिसरातील नयनरम्य दृश्य.